




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २३८ •गुरूवार, दि.२७ नोव्हेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# बीडची नगरपरिषद एकहाती भाजपच्या ताब्यात द्या - भाजप नेत्या, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे



### ● पंकजाताईंमुळे रेल्वे आली, पालवण चौक भागाचा कायापालट करू- डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले की, बीडला रेल्वे आणण्याचे स्वप्न स्व. केशरकाकू आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांचे होते. ते पंकजाताईंमुळे पूर्ण झाले आहे. आता बीडमधील पालवण चौक भागाजवळ रेल्वे आली आहे. या भागाचा कायापालट होणार आहे. अधिकाधिक विकासासाठी भाजपच्या डॉ. ज्योती घुंबरे यांच्यासह सर्व नगरसेवकपदाच्या उमेदवारांना निवडून द्यावे, असे आवाहन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले.

### ● बीड शांत ठेवण्यासाठी भाजपला मतदान करा- नवनाथ शिराळे

बीडमध्ये विरोधक जात-धर्माचा मुद्दा काढून मते मागत आहेत. सासूसाठी जावई मतदान मागत आहे. यांच्यामुळे बीड अशांत होण्याची चिन्हे दिसत आहेत. हे आपल्याला रोखावे लागणार आहे. नेहमीप्रमाणे बीड शांत ठेवण्यासाठी भाजपला मतदान करावे, असे आवाहन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे यांनी केले.

### ● लाडक्या बहिणींमुळे भाजप जिंकणार-ॲड. सर्जेराव तांदळे

गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपने सत्ता मिळवून विकास केला आहे. पंकजाताईंच्या माध्यमातून आणखी विकास करायचा आहे. त्यासाठी बीड नगरपरिषद भाजपच्या ताब्यात द्यावी लागेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांच्यामुळे 'लाडकी बहीण' योजना सुरू आहे. या योजनेचा मोठा लाभ मिळत असून पुन्हा एकदा बीडमध्ये लाडक्या बहिणींमुळे भाजप जिंकणार आहे, असा विश्वास ड. सर्जेराव तांदळे यांनी व्यक्त केला.

**बीड । प्रतिनिधी**

जयदत्त क्षीरसागर हे बीडचे आमदार असताना आम्ही एकत्रितपणे विकासाची अनेक कामे केली आहेत. बीडच्या अधिकाधिक विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः झुकते माप देतील. त्यासाठी मी स्वतः ठामपणे आग्रह धरणार आहे. त्यामुळे बीडची नगरपरिषद एकहाती भाजपच्या ताब्यात द्या, असे आवाहन भाजप नेत्या, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.

भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह नगरसेवकपदाच्या प्रभाग क्र. १३ च्या उमेदवार समिक्षा प्रशांत शेटे, सय्यद मुस्तफा तसेच प्रभाग क्र. १४ चे उमेदवार गणेश लक्ष्मणराव वाघमारे, सौ. मनिषा सुधीर सुरवसे यांच्यासह इतरही उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि. २६) सायंकाळी जाहीर सभा पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे, जिल्हा सरचिटणीस ॲड. सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शहराध्यक्ष अशोक लोढा, डॉ. आदित्य सारडा, चंद्रकांत फड, देविदास नागरगोजे, संतोष राख, रविंद्र कदम, भाजपचे तालुकाध्यक्ष मनोज पाटील, सुंदर चव्हाण, बालाजी पवार, संभाजी सुर्वे, नूर लाला, डॉ. अभय वनवे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, डॉ. योगेश व डॉ. सारिका हे व्यथित मनःस्थितीत माझ्याकडे आले होते. त्यांना मी भाजपमध्ये सामावून घेतले. बीडमध्ये भाजपच्या चिन्हावर आम्ही पहिल्यांदाच संपूर्ण ताकदीने निवडणूक लढवत आहोत. आता डॉ. क्षीरसागर ▶ उर्वरित पान २ वर

## ६ वर्षीय मुलीवर अत्याचार; आरोपीही अल्पवयीनच

**शिरूर (का) । प्रतिनिधी**

आई-वडील शेतामध्ये गेल्याचा फायदा घेत सोळा वर्षीय तरुणाने सहा वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना शिरूर कासार तालुक्यातील वारणी या गावांमध्ये शुक्रवार दि.७-नोव्हेंबर रोजी घडली आहे. पीडित मुलीच्या फिर्यादीवरून गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी पोक्सो कायद्याअंतर्गत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार (१६) याच्या विरोधात शिरूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी संभाजी केदार याला पोलिसांकडून अटक ही करण्यात आली आहे. शिरूर कासार तालुक्यातील वारणी या गावातील पीडित मुलीचे आई-वडील घरातील बाजार संपला म्हणून शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर रोजी बाजाराचे सामान आणण्यासाठी शिरूरमध्ये आले होते. यावेळी त्यांचा सतरा वर्षीय मुलगा सुरज शेतामध्ये कापूस वेचणी करण्यासाठी गेला होता, तर - सहा वर्षाची पहिलीच्या वर्गात शिकत अस-लेली चिमुकली मुलगी शाळेमध्ये सकाळी १० वाजता गेली होती. दुपारी १.३० वाजता शिरूर येथून बाजार करून आलेले आई-वडील पुन्हा शेतामध्ये कापूस वेचणीसाठी गेले होते. पीडित मुलीच्या आजीजवळ आई ▶ उर्वरित पान २ वर

## स्व. काकूंच्या विचारांना मुठ माती देणाऱ्या योगेश क्षीरसागरांना बीडच्या जनतेन का स्वीकारायच?

**बीड । प्रतिनिधी**



स्व. केशरबाई क्षीरसागर यांच्या धर्मनिरपेक्ष विचारधारेला डॉ. योगेश क्षीरसागर यांनी मूठ माती देत भाजपची कास धरली. क्षीरसागर कुटुंबाच्या इतिहासाचा विचार केला तर राजकीय तडजोड म्हणून देखील काकूंच्या विचारांशी फारकत आज पर्यंत कोणीच घेण्याचं धाडस केलं नव्हतं. त्यामुळेच बीड करांनी या घराण्याला अक्षरशः डोक्यावर घेतलं. पण त्याच विचारांना तिलांजली देणाऱ्या डॉ.योगेश क्षीरसागरांच्या मतलबी राजकारणाला जनता थारा देत नसल्याचं चित्र सध्यातरी न प निवडणुकीत दिसत आहे. स्व. केशरबाई क्षीरसागर यांनी कधीच जातीपातीचं धर्माचं राजकारण केलं नाही. विरोधकांनाही आपलंसं करत बीडच्या विकासाला चालना दिली. अगदी त्याच धर्मनिरपेक्ष जात विरहित राजकारणाचा वसा पुढच्या पिढीने ▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्हा पोलीस आधिक्षकांचे विशेष अभिनंदन ज्यांच्या हाद्दीत अवैध धंद्याचे शेत्र त्यांनांचा वाटु लागले प्रस्तीतीपत्र ! – शेख खिजर

**तलवाड़ा । प्रतिनिधी**




गेवराई तालुक्यातील काही पोलीस स्टेशनच्या हाद्दीत सातत्याने मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे अवैध धंदे चालत आसल्याचे आणेक वेळा समोर आलेले असुन अर्थिक देवाण घेवाणीच्या माध्यमातून सर्वकाही अलबेल आसल्याच्या तो-यात पोलीस प्रशासन वागत आसतांना ज्या पोलीस स्टेशनच्या हाद्दीत विशेष करुन ज्यांच्या बीट शेत्रा मध्ये जोमाने अवैध धंदे चालत आसल्याची चर्चा होत आसतांना जिल्हा पोलीस आधिक्षक त्याच पोलीस कर्मचा-याने एखांद्ये प्रकरण व्यग्ये रितीने हाताळल्याने त्यास प्रस्तीतीपत्र देऊन गौरवान्वित करतात. ही बाब नक्किच अभिनंदनीय आहे त्यामुळे बीड जिल्हा पोलीस आधिक्षकांचे देखील शब्द सुमनाने अभिनंदन व्हावे आसे सूचक ऊदगार गौरवान्वित पोलीस कर्मचा-यांच्या हद्दीत ऐकावयास मिळु लागल्याने जिल्हा पोलीस आधिक्षकांचे देखील आभिनंदन करावेसे वाटल्यावाचुन राहीले नाही. एखांदी व्यक्ति आप आपल्या शेत्रात ऊलेखिनय कार्य करत आसेल तर त्यास गौरवान्वित करण्यात काहीच गैर नाही परंतु एका वैध कार्याने इतर अवैध गैरकृत्यांना पाठीशी घालने देखील चुकिचे आसल्याच्या प्रतिक्रिया प्रस्तीतीपत्राने गौरवान्वित पोलीस कर्मचा-याच्या प्रभागामध्ये ऐकावयास मिळु लागल्या आसल्याने जिल्हा पोलीस आधिक्षकांच्या या दुटप्पकीय भुमेकेमुळे अवैध धंद्यांना व गौरवान्वित पोलीस कर्मचा-यांना पाठबळ मिळत आसल्याच्या बोलक्या प्रतिक्रिया या निमित्ताने वर्तवल्या जाऊ लागल्या आहेत.

**▸ तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत सातत्याने मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे अवैध धंदे चालत आसल्याचे आणेक वेळा समोर आलेले आहे. या बाबत एका व्हाटस्प ग्रुपवर गावकरी आपल्या प्रतिक्रिया नोदवत आसतांना अवैध धंद्याचा पाठीराखा आसलेला संबंधित तलवाडा बीटचा आमलदार त्याच ग्रुपपर जातीय भावना दुखवणारी होणारी पोष्ट टाकतो. आस्या तलवाडा बीट आमलदाराची तात्काळ बीट काढुन घेणे हे जिल्हा पोलीस आधिक्षकांच्या ककक्षेतुन कार्यवाही होणे फार म्हत्वाचे आहे आसे मनोगत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी माध्यमातून व्यक्त केले आहे.**

## 25 लाखाचा गुटखा जप्त; बीड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यात अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिलेल्या सूचनांनुसार अंबाजोगाईत मोठी कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका कारवर टाकलेल्या छाप्यात तब्बल २५,२६,२००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.मिळालेल्या गुप्त बातमीनुसार बर्दापुर येथून अंबाजोगाईकडे एका पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा कारमधून अवैध गुटखा वाहतूक केली जात असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने शेलू अंबा रोडवरील टोलनाक्याजवळ सापळा लावून संशयित वाहन क्रमांक MH-14-GU-0699 अडवले. वाहनाची तपासणी केल्यावर त्यात विविध कंपन्यांचे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित ▶ उर्वरित पान २ वर

## सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने हरिभाऊ शेळकेनीं केले रस्त्याचे काम



**बीड । प्रतिनिधी**

निवडणूकी दरम्यानच्या काळात हा रस्ता दुरुस्त करून देण्याचे अनेक बोलघेवड्या नेत्यांनी आश्वासने दिली होती परंतू निवडणुक काळात सवंग लोकप्रियता मिळवण्यापूरतीच आश्वासने होती का? असा प्रश्न ग्रामस्थांमधून व्यक्त केला जात आहे. येत्या एक ते दीड महीन्यात जिल्हा नियोजन मंडळातर्गंत रस्त्यावर डांबरीकरण करून कायमस्वरूपी रस्त्याचे काम करण्याची ग्वाही हरिभाऊ शेळके यांनी वांगी येथील ग्रामस्थांना दिली. यावेळी ▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहराच्या विकासासाठी एक संधी द्या: आ. संदीप क्षीरसागर

### सर्वच कॉर्नर बैठकांना विराट सभेचे आले होते स्वरूप

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहराचा सर्वांगीण विकास करून दाखवितो फक्त एक संधी द्या आ.संदीप क्षीरसागर यांनी स्वराज्य नगर, धोंडीपुरा, बाबाचौक इस्लामपुरा आदी भागात प्रचार सभेत बोलताना प्रतिपादन केले आहे. तर या बैठकांना मिळालेला प्रतिसाद हा एक प्रकारे विजयी सभे प्रमाणे दिसत असल्याने बीडमध्ये तुतारीच वाजणारा असे मतदारांनी ठरविल्याचे प्रतिसादावरून दिसून येत आहे. नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. संदीप क्षीरसागर हे बीडमध्ये एकटेच लढत आहेत. ते दररोज नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी आ.क्षीरसागर दररोज वेगवेगळ्या प्रभागात जाऊन कॉर्नर सभा घेत आहेत. या कॉर्नर सभांना मतदारांचा उत्साहपूर्ण असा प्रतिसाद मिळत असल्याने बीडमध्ये ▶ उर्वरित पान २ वर






## टक्केवारी खाऊन राजकारण करणाऱ्यांच्या तोंडी शहराच्या विकासाची भाषा शोभत नाही – बाळराजे पवार



### भाजपच्या मेनरोड परिसरातील कॉर्नर सभेला तुफान गर्दी

**गेवराई । प्रतिनिधी**

विकासाची भाषा करून, जनतेची दिशाभूल करणारे अमरसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवावे, तुम्ही केलेली एक चांगली पाणी पुरवठा योजना सुरू असलेली दाखवा, पोपटपंची करून विकासाच्या गप्पा मारता आणि टक्केवारी खाता तुमच्या तोंडात विकासाची भाषा शोभत नाही अशी खरमरीत टिका भाजप नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना केले.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि. २५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य कॉर्नर सभेत भाजप युवा नेते बाळराजे दादा पवार यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यावर आक्रमक आणि कडक शब्दात हल्ला चढवला. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गिताभाभी पवार तसेच प्रभाग क्रमांक ८, ९ व १० मधील उमेदवार सोनाली सुभाष सुतार, शहेदाद भाई आणि एजाज भाई सय्यद यांच्या प्रचारार्थ झालेल्या या सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजीमंत्री बदामरावजी पंडित, उमेदवार सौ. गीताभाभी पवार, रोहीत पंडित, प्रा.पी टी चव्हाण, अमोल करांडे, राजेंद्र राक्षसभुवनकर, सय्यद एजाज, शेख शेहदाद, कैलास माने, बबलू खराडे, महिला आघाडीच्या सौ.रत्नमाला मोटे यांच्यासह आदींची ▶ उर्वरित पान २ वर

# स्मिता विष्णू वाघमारे एकमेव अनुभवी उमेदवार



भाजपा, राष्ट्रवादी (श.प) आणि राष्ट्रवादी (अ.प) या पक्षात बीड नगराध्यक्षपदाची तिरंगी लढत होईल असे चित्र उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निर्माण झाले आहे. सौ. स्मिता विष्णू भाऊ वाघमारे यांना राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) ने उमेदवारी दिली असून त्यांना बीड नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष आणि नगरसेवक असा एकूण तीन टर्मचा अनुभव आहे. उमेदवारी दाखल केलेल्या महिलेमध्ये राजकीयदृष्ट्या त्या एकमेव अनुभवी उमेदवार आहेत.तर भारतीय जनता पक्षाने डॉ सौ. ज्योती घुबरे यांना उमेदवारी दिली असून त्या भूलतज्ञ आहेत , अजितद पवार यांच्या राष्ट्रवादी कडून उमेदवारी देण्यात आलेल्या सौ. प्रेमलता पारवे या निवृत्त नायब तहसीलदार असून त्यांना महसूल प्रशासनाचा अभ्यास आहे. याशिवाय अन्य मागास प्रवर्गातील महिलांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले असून यातील काहीना राजकीय पार्श्वभूमी असली तरी ती त्यांच्या पतीच्या,वडिलांच्या,भावाच्या माध्यमातून आहे.उमेदवारी देताना मागास प्रवर्गा अंतर्गत विविध जातींचाही विचार करण्यात आल्याचे दिसून येत आहे. यातील सर्वात आश्चर्यकारक उमेदवारी म्हणजे भाजपच्या डॉ.ज्योती घुमरे यांची असून त्या नाक–कान–घसा विकारतज्ञ डॉ.रवी घुमरे यांच्या सुविद्य पत्नी आहेत.तर सौ.प्रेमलता पारवे यांची ओळख त्या येथील सायं दैनिक सिटीझनचे संपादक शेख मुजीब यांच्या सासूबाई अशी करून दिली जात आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवारांची यादी कोणत्याच पक्षाने जाहीर केली नव्हती,ती पक्षाने ए.बी.फॉर्म दाखल केल्यावरच स्पष्ट झाली. अनुभवी नगरसेवकांना कोणत्या न कोणत्या पक्षाने उमेदवारी देतांना सामील करून घेतले आहे. काहीजण पुन्हा स्वगृही परतले असून काहींनी त्यांच्या पक्षाची वाट सोडून दुसऱ्या पक्षाची वाट धरली आहे. विविध राजकीय घराण्यातील पुढची पिढीही नशीब आजमावत असून तरुण उमेदवार देखील मोठ्या संख्येने निवडणूक लढवत आहेत.

# काळाला अनुसरून महाकालीची उपासनाही आवश्यक !

सध्या मार्गशीर्ष महिना सुरु आहे. या महिन्यातील गुरुवारी बहुतांश महिला श्री महालक्ष्मी व्रत करतात. या दिवशी दिवसभर उपवास केला जातो. चौरंगावर श्री महालक्ष्मीच्या रूपाने कलश मांडून तिची मनोभावे पूजा केली जाते. सुगंधी फुलांचा गजरा किंवा वेणी माळली जाते. देवीसमोर श्री महालक्ष्मी व्रताची कथा आणि महती महिती यांचे वाचन केले जाते. देवीची आरती केल्यावर देवीला पाच फळांचा नैवेद्य दाखवला जातो. गेल्या काही वर्षांपासून पूजेच्या कलशावर देवीचा मुखवटा लावून त्यावर वस्त्र आणि दागिने यांची सजावट करण्याची पद्धत रूढ होऊ लागली आहे. अनेक महिला हौस म्हणून पूजेच्या चौरंगाभोवती आकर्षक फुलांची सजावट करतात, दाराबाहेर रांगोळी काढून दारात पणत्या लावतात. नैवेद्यासाठी गोडधोड बनवतात. महाराष्ट्रात बहुतांश प्रांतात महिला हे व्रत करत असून वर्षागणिक व्रत करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढच होत आहे. शहरासारख्या ठिकाणी नोकरी व्यवसाय करणाऱ्या महिलाही वेळात वेळ काढून हे व्रत करतात. येणारा गुरुवार हा मार्गशीर्ष महिन्यातील अखेरचा गुरुवार असणार आहे. या दिवशी महालक्ष्मी व्रताचे उद्यापन केले जाते त्यानिमित्ताने सवाष्ण महिलांना वाण, गजरा अथवा फुल आणि हळद कंकू दिले जाते. श्री महालक्ष्मी देवीप्रती असलेली श्रद्धा याबरोबरच महालक्ष्मी देवीची कृपा आपल्या कुटुंबावर सदैव राहावी हा सकाम हेतूही या व्रतामागे दडलेला असतो. शालेय जीवनात ज्ञानार्जन करून आपण श्री सरस्वती देवीची उपासना करत असतो. अनेक महिला आज उच्च शिक्षण घेऊन न्याय, वैद्यक, संशोधन, सैन्य, पोलीस आदी सर्वच क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. उद्योजक क्षेत्रातही अनेक महिलांनी आज उत्तुंग भरारी घेतली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढू लागला आहे. त्या त्या क्षेत्रातील ज्ञान घेऊन त्यामध्ये पारंगत होणे ही श्री सरस्वती देवीची उपासनाच आहे. शक्तीची अर्थात देवीची तीन प्रमुख रूपे आहेत. त्यांतील श्री सरस्वती आणि श्री महालक्ष्मी या देवीच्या तारक रूपाची उपासना आपण प्रत्येक जण करत आपापल्या परीने करत असतो; मात्र देवीच्या ज्या रूपाच्या उपासनेची आज नितांत आवश्यकता आहे त्या भक्तांच्या उद्धारासाठी दृष्टांचा संहार करणाऱ्या महाकालीची उपासना महिलावर्ग केव्हा करणार आहे ? सध्याची देशाची आणि समाजाची स्थिती पाहता कोणत्याच क्षेत्रात महिला सुरक्षित नाहीत. स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये वर्षागणिक कमालीची वाढ होऊ लागली आहे. शहर असो वा खेडे, गरीब असो वा श्रीमंत, शाळकरी कन्या असो वा वयोवृद्धा वासनांधांच्या विखारी नजरांपासून आज कोणीच सुरक्षित नाहीत, दर मिनिटागणिक देशात कुठल्या ना कुठल्या ठिकाणची स्त्री आज अत्याचाराला बळी पडू लागली आहे. स्त्री अत्याचारावर अंकुश आणण्यासाठी कठोर कायदे करूनही या घटनांमध्ये घट झालेली नाही. स्त्रीने आर्थिक दृष्ट्या सबळ व्हावे यासाठी सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली मात्र महिलांच्या सुरक्षेसाठी शासन राबवत असलेल्या योजना केवळ नावाला शिल्लक असल्याने स्त्री अत्याचाराचा आलेख तिळमात्र कमी होताना दिसत नाही. ज्या महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीला मातेसमान मानण्याची शिकवण दिली त्याच छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात स्त्रीची होत असलेली अवहेलना लज्जास्पद आहे. पोलीस प्रशासन असो वा नातेवाईक, सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या मदतीला धावून येऊ शकत नाहीत. त्यासाठी स्त्रियांनी स्वतः चे रक्षण स्वतः करण्यासाठी सिद्ध व्हायला हवे. प्रतिकूल प्रसंग केव्हा येईल ही वेळ कधी सांगून येत नाही त्यासाठी आपले मन आणि शरीर सततच प्रतिकारक्षम ठेवण्याची गरज आहे आणि त्याकरिता प्रत्येक स्त्रीने स्वतःचे रक्षण स्वतः करण्याची कला अवगत करून घ्यायला हवी. स्वसंरक्षणाचे किमान प्रशिक्षण प्रत्येकीने आजच्या काळात घ्यायलाच हवे. देवीच्या महाकाली स्वरूपात तिच्या प्रत्येक हातात शस्त्र आहे. या शस्त्रांचा वापर करून तिने सज्जनांचे रक्षण आणि दृष्टांचा संहार केला आहे. देवीच्या या रूपाची उपासना आज प्रत्येकी स्त्रीने करायला हवी. राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, राणी चेन्नमा यांनी आपल्या राज्याच्या रक्षणासाठी प्रसंगी शस्त्र हाती घेऊन पराक्रम गाजवला आहे, पराक्रमी स्त्रियांची अशी अनेक उदाहरणे इतिहासात घडून गेली आहेत. या प्रत्येकीने शस्त्रांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले होते, त्यांच्यामध्ये कमालीचे मनोधैर्य आणि दुर्दम्य इच्छाशक्ती होती.

**–सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## बीडची नगरपरिषद....

दांपत्याच्या माध्यमातून बीडमध्ये नक्कीच कमळ फुलेल. अनेकांचे चष्मे वेगवेगळ्या रंगांचे असू शकतात; मात्र आमच्या लेन्समध्ये भगवा, हिरवा, निळा, पिवळा हे सर्वच रंग समान आहेत. सर्व समाज, सर्व घटक आम्हाला समान आहेत. भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे या भूलतज्ज्ञ आहेत. त्या निवडून आल्यास राजकारणातील वाईट प्रवृत्तींना 'भूल' देऊन बाजूला सारण्याचे काम त्या करतील. जिल्ह्यातील भाजपचे सर्व उमेदवार उच्चशिक्षित, सोज्वळ आणि सुसंस्कृत आहेत. बीडच्या बिंदुसरा नदीचे सुशोभीकरण करू. त्या नदीचे रूपडे बदलण्याची जबाबदारी मी स्वतः घेत आहे. रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मार्गासाठी अतिरिक्त निधी देण्याची मागणी निश्चितच पूर्ण केली जाईल. प्रास्ताविक प्रभाग क्र. १४ मधील उमेदवार गणेश वाघमारे यांनी केले. भाजपचे युवा नेते संभाजी सुर्वे यांनी आभार मानले.

## टक्केवारी खाऊन...

उपस्थिती होती. या सभेत बोलताना बाळराजे पवार यांनी अमरसिंह पंडित यांच्यावर विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप करत कठोर शब्दांत समाचार घेतला. ते म्हणाले, विकासाची भाषा करणारे बीडचे अमरसिंह पंडित गेवराई तालुक्यातील विकासाचे एक गाव दाखवू शकत नाहीत. एकही पाणी पुरवठा योजना योग्यरित्या सुरू नसताना विकासाची गप्पा मारणे म्हणजे जनतेची थेट फसवणूक आहे.ते पुढे म्हणाले, पोपटपंची करू नका. विकासाची भाषा करता आणि मागच्या बाजूने टक्केवारी खाता. गेवराईच्या जनतेला दाखवायला तुमच्याकडे एकही भरीव काम नाही. तुम्ही गेवराईचे हित साधणारे नाही, तुम्ही लोकांची दिशाभूल करत आहात.अमरसिंह पंडित यांच्यावर हल्ला चढवत बाळराजे पवार म्हणाले की, गेवराईत त्यांच्या नावाने विकासाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला जातो; पण प्रत्यक्षात सुरू असलेले काम काहीच नाही. गावोगावी जनतेसमोर विकासाच्या गोष्टी सांगतात, पण दाखवायला एकाही प्रकल्पाची प्रगतीपथावरील स्थिती नाही. गेवराईला मागे टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या या ढोंग्यांना जनता ओळखते, असे ते म्हणाले.बाळराजे पवार यांनी पंडित यांच्यावर खोटे आश्वासन, फसवी जाहिरातबाजी आणि जनतेच्या भावनांचा गैरवापर केल्याचे आरोप करत त्यांना थेट आव्हान दिले. गेवराईत उभा राहून दाखवा एक गाव जिथे विकास तुमच्या काळात झाला, एक योजना जिथे

◆ पान १ वरून पुढे...

पाण्याचा प्रश्न सुटला. काहीच नाही. केवळ भाषणबाजी करून आपण नेता होत नाही. नेता तोच जो काम दाखवतो, असे ते म्हणाले.

## ६ वर्षीय मुलीवर...

वडिलांने जेवण डब्बा ठेवून आजी साडेचार वाजता मुलगी घरी येईल तिला जेवण द्या व तिच्याकडे लक्ष द्या असे सांगून आई वडील कामासाठी शेताकडे गेली होती. आई वडील घरी नसल्याचा फायदा घेत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार वय सोळा वर्षे याने या चिमुरडीला उचलून नेऊन रिकाम्या पाण्याच्या हौदा मध्ये लैंगिक अत्याचार करून त्या ठिकाणहून पळ काढला होता. सायंकाळी वाजता आई–वडील घरी आल्यानंतर त्या चिमुरडीने सर्व हकिगत रडत रडत आपल्या आईला सांगितली. परंतु या घटनेबद्दल तक्रार केली तर अब्रू जाईल आणि आम्हांला मारतील या भीतीपोटी या घटनेची तक्रार केली नव्हती. मात्र पीडित आईच्या तक्रारीवरून गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी शिरूर पोलीस स्टेशन मध्ये पोक्सो कायद्यांतर्गत आरोपी संभाजी ज्ञानेश्वर केदार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## स्व. काकूंच्या...

देखील घेतला. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत डॉ.भारतभूषण क्षीरसागर असोत की जयदत्त क्षीरसागर असोत. पुढच्या पिढीत संदीप क्षीरसागर असोत यांनी कधीच मतलबी राजकारणासाठी स्व. काकूंच्या विचारधारेशी तडजोड अत्यंत बिकट परिस्थितीत देखील कधीच केली नाही. त्याच विचारधारेवर चालत असताना जयदत्त क्षीरसागर यांनी देखील कधीच विशिष्ट धर्माची विचारधारा बाळगणाऱ्या पक्षाचा हात स्वतःच्या सोयीसाठी धरला नाही. त्यामुळेच जयदत्त क्षीरसागर यांनी जातीयवादी पक्षात प्रवेश करण्याची भूमिका घेतली नाही. त्यामुळेच आजही बीडच्या राजकारणामध्ये त्यांची ताकद पूर्वी इतकीच टिकून आहे.डॉ. भारतभूषण क्षीरसागर आणि नगरपालिका निवडणूक इतकं समीकरण पक्क होतं की अध्यक्ष म्हणून कायम त्यांचा गौरव बीडच्या जनतेने केला. त्यांच्याही विचारधारेपासून योगेश क्षीरसागर दूर गेले.संदीप क्षीरसागर देखील तोच राजकीय वसा घेऊन पुढे चालत आहेत. काकूंच्या विचार धारेवरच चालायचं कुठल्याही परिस्थितीत तडजोड करायची नाही हाच विचार स्वीकारत संदीप क्षीरसागरांनी कुटुंबातील वादाने तोंड काढल्यानंतर देखील मागच्या न.प. निवडणुकीत काकू – नाना विकास आघाडी स्थापन करून चांगलं यश मिळवलं. त्याचाच फायदा पुढे त्यांना कायम होत आला.

◆ पान १ वरून पुढे...

त्यामुळेच प्रत्येक समस्येचे समाधान बंगलाहेच आहे. असं सांगितलं जायचं. प्रत्येक जाती धर्मातील लोक हक्काने बंगल्यावर जाऊन आपली कैफियत मांडत काम करावंच लागेल म्हणून भांडायला देखील मागेपुढे पाहत नसल्याचं आज पर्यंतच चित्र कायम राहिलं गेलं. मात्र जनतेत निवडणुकीपुरतचं मिसळायचं काकूंच्या नावावर मत मागायची त्यानंतर जनतेला विसरून जायचं. हा फंडा कायम ठेवत डॉ. योगेश क्षीरसागर यांनी जनतेच्या तोंडाला आजपर्यंत फक्त पानच पुसली. योगेश क्षीरसागर कडून आश्वासनांची खैरातच जनतेच्या वाट्याला आली. आता तर जातीयवादी चेहऱ्याच्या पक्षाशी हात मिळवणी करत बीडच्या जनतेला स्वतःच्या स्वार्थासाठी भाजपाच्या दावणीला बांधण्याच काम डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सुरू केलं आहे. त्यांनाही राष्ट्रवादी अजित पवार गटाशी जमेनासं झाल्यानंतर या निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांच्यासारखीच आघाडी करता आली असती.जनतेला काकूंच्या विचारधारेवर मत मागता आली असती. त्यात मोठ्या प्रमाणावर देखील यश निश्चित मिळालं असतं. मात्र स्वार्थाची पट्टी डोळ्यावर बांधली की कुटुंबाच्या वारसाने चालत आलेल्या विचारांची राख रांगोळी होते आणि तिथेच अध:पतनाला सुरुवात होते हा आजपर्यंतचा इतिहास आहे. मुस्लिम,दलित, मराठा इतर छोट्या छोट्या जाती धर्माच्या लोकांनी भाजपचा झेंडा हातात घेतलेल्या योगेश क्षीरसागर यांना का साथ द्यावी? जे स्वतःच्या कुटुंबाने जपलेल्या संस्कार, विचारधारेला मूठ माती स्वार्थासाठी देऊ शकतात ते प्रसंगी जनतेला मुठ माती द्यायला का मागे पुढे पाहणार नाहीत? असा प्रश्न बीडच्या जनतेतून विचारला जात आहे. जे काकूंचे ,डॉ. भारत भूषण क्षीरसागर यांच्या विचारांचे झाले नाहीत ते बीडकरांचे कसे होणार?

## 25 लाखाचा...

केलेला गुटखा आढळला. चालक हमीद सय्यद (वय ४५, रा. साय्यद गल्लि, माजलगाव) याला ताब्यात घेण्यात आले. वाहनासह एकूण २५,२६,२००/– किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय दंडसंहितेसह इतर संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाईत पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पाकिस्तानी गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक शिवाजी बेंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे/१४२९ केकान, १८३७ गिते, पोना/१९१८ भताने व पोया १०५५ अडके तसेच अंबाजोगाईचे सहाय्यक पोलिस अधीक्षक व

◆ पान १ वरून पुढे...

तसेच संपूर्ण पथकाचा सहभाग होता.

## सामाजिक बांधिलकी...

ग्रामपंचायत सदस्य आदि उपस्थित होते. मात्र हरिभाऊ शेळके यांनी बुधवार दिनांक २६ डिसेंबर रोजी स्वखर्चाने केला. राज्य सरकारने गावाचा विकास करण्यासाठी अनेक योजना अंमलात आणल्या. त्याचा फायदा होतांना दिसत आहे. पण या गावांना जोडणारा रस्ताच जर खराब असेल तर त्याचा फटका अशा गावांना बसणार आहे. गेल्या काही दिवसांत खड्डे विथ सेल्फी हा विषय काही राजकीय नेत्यांनी गाजवला. मात्र, तो फक्त सार्वजनिक बांधकाम विभागापुरता मर्यादित होता. त्यात ग्रामीण भागातील रस्ते दुर्लक्षितच राहिले. काही कामांना हरिभाऊ शेळके यांच्या प्रयत्नामुळे आता वेग येनार असल्याचे बोलले जात आहे. आगामी काळामध्ये हरिभाऊ शेळके यांना ढेकनमोह सर्कल मधून जनता जनर्धन पंचायत समिती मेंबर करणार असल्याचे बोलले जात आहे.

## बीड शहराच्या....

तुतारीच वाजणार असे चित्र निर्माण झाले आहे. बुधवारी (दि.२६) रोजी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. स्मिता विष्णू वाघमारे तसेच प्रभाग क्रं.२५ च्या उमेदवार विद्या गोरक्ष गायकवाड, विजय बळीराम लव्हाळे यांच्या प्रचारार्थ स्वराज्य नगर येथे कॉर्नर सभा, प्रभाग क्रं.०७ उमेदवार सुरेखा संदिप साळुंके, किशोर नारायणराव काळे यांच्या प्रचारार्थ धोंडीपुरा येथे कॉर्नर सभा तर प्रभाग क्रं.२० मध्ये बाबा चौक, इस्लामपुरा भागात शेख शाहानूरबी खाजामिया, शेख सरफराज शेख अब्दुल सलाम यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेतल्या आहेत. या कॉर्नर सभा नव्हे तर विजयी सभा होत्या अशी चर्चा गर्दी पाहून सुरू होती. यावेळी आ. संदीप क्षीरसागर बोलताना म्हणाले की, आता अनेकजण विकासाच्या थापा मारत आहेत. पण कामाला आम्हीच रस्त्यावर असतोत. विकास काय असतो हे मी दाखवून देतो. तुमच्या मनातील बीड शहराचा सर्वांगीण विकास करू, फक्त एक संधी द्या असे सांगत आ.संदीप क्षीरसागर यांनी शेवटी त्यांनी येत्या २ डिसेंबर रोजी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे आणि सर्व उमेदवारांना तुतारी आणि मशाल या चिन्हा समोरील बटन दाबून विकास आणि कामे करणाऱ्यांना बळ द्या असे आवाहन केले. यावेळी त्यांचे सर्व पदाधिकारी उमेदवार यांच्या सह बीडचे विकास प्रिय मतदार बंधू भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## मतदान 100%....

प्रतिसाद दिला. काहीही करा,पण मतदान चुकवू नका, सुट्टी आहे म्हणून गावाला जावु नका, बाहेरगावी असणाऱ्यांनी अवश्य मतदानाला गेवराई शहरात येऊन मतदान करा असे म्हणत हात जोडून विनंती करीत,या ज्युनिअर चार्ली फाऊंडेशनने राज्यभर ही मोहीम सुरू केली आहे. सु–लक्ष्मी सेवाभावी संस्था व चार्ली फाउंडेशन च्या वतीने जनजागृती साठी, मतदान, पोलीओ, रस्ते वाहतूक सुरक्षा अथवा कुठलेही सर्वेक्षण, तो शासनाच्या खांद्याला खांदा लावून चार्लीच्या भूमिकेतून पटवून देण्याचे काम करतात.तसेच सुमित सु–लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्य करतात.या टीमने राज्यभरात ३१ ज्युनिअर चार्ली उभे केले आहेत. हे सर्वच चार्ली बॉलर टोपी, मिशा आणि छडी असलेल्या चार्ली चॅप्लिनच्या भूमिकेतून मतदानाचे आवाहन करत आहेत. गेवराई येथे आज या मतदान जनजागृती कार्यक्रमाची सुरुवात तहसीलदार कार्यालय,बस स्थानक, पंचायत समिती कार्यालय,नगरपरिषद कार्यालय,मुख्य बाजारपेठ,पोलीस स्टेशन गेवराई या ठिकाणी चार्ली चापलीन च्या भूमिकेतून सुमित पंडित यांनी नागरिकांना हसवत हात जोडून मतदान करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे आयोजन माननीय जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री विवेक जॉन्सन, निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे साहेब,यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी नगरपरिषद श्री विक्रम मांडुरके व नायब तहसीलदार संजय सोनवणे यांच्या प्रयत्नातून मतदान जनजागृती करण्यासाठी सहकार्य केले.या कार्यक्रम यशस्वीतेसाठी निरीक्षण अधिकारी श्री गजानन मोरे, पोलीस निरीक्षक श्री किशोर पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री संतोष जंजाळ, श्री दीपक लंके, श्री सतीश कोतकर, श्री अण्णासाहेब पवार, गेवराई नगरपालिकेच्या सुश्री संध्या थोरात, श्री प्रकाश रानमारे गेवराई शहरातील नागरिक मतदार व कर्मचारी उपस्थित होते तसेच ज्युनिअर चार्ली सोमनाथ स्वभावने व सुमित पंडित यांचे सर्वदुर कौतुक होत आहे.

## बीड नगर....

बजावणार आहेत. त्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

बीड पालिकेत १९ उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी उभे राहिले आहेत. एका मशिनवर १५ उमेदवारांची नावे असणार आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष पदासाठीच २ मशिन असणार आहेत. याशिवाय वार्डातील दोन्ही नगर सेवकांना मतदान करायचे आहे. त्यामुळे एका मतदाराला तीने वेळा वेगवेगळे पसंतीचे बटन दावावे लागणार आहे. यात अनेक मतदारांचा गोधळ उडत आहे. बीड पालिकेत ५२ नगरसेवक आणि नगराध्यक्ष निवडीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी ८० मतदान केंद्रांपैकी ५२ केंद्रावर सीसीटीव्ही लावले जाणार आहेत. बीड शहरात नगर पालिका निवडणुकीमध्ये एकही मतदान केंद्र संवेदनशील नाही. त्यामुळे प्रशासनाचा मोठा ताण कमी झाला आहे.

## वैद्यनाथ सहकारी...

कारखान्याला उतरती कळा आली. कामगाराचे पगार, शेतकर्याचा उस दुसर्या कारखान्यांना द्यावा लागला व तो कारखाना शेवटी बरीच वर्षे बंद झाला व तो पून्हा विकला गेला. सभासद शेतकर्यांना शेअर पोटी एक लाख रूपये द्या– पशुसंवर्धन व पर्यावरणमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सभासद शेतकर्यांना विश्वासात न घेता परस्पर वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना विक्रीस काढला व तो विकला परंतू आम्हा शेतकर्यांच्या शेअरचा विचार न करता हा कारखाना त्यांनी परस्पर विकला आम्हाला आमच्या शेअरपोटी प्रत्येक शेतकर्यांना एक लाख रूपयाची भरपाई देण्यात यावी नसता आम्ही सभासद शेतकरी न्याय मागण्यासाठी न्यायालयात न्याय मिळण्यासाठी जाणार आहोत. त्या अधी आमच्या सभासदाच्या शेअरचा त्यांनी अगोदर विचारा करावा. स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य, त्यांचे शेतकर्याचे होणारे नुकसान व कारखान्याची केलेली दैना हे सर्व बघून त्यांच्या आत्म्याला काय वाटत असेल. ज्यांना मी माझा वारस केले. त्यांनी हे काय केले. असे वाटत असेल. त्यांच्या वारसानेच त्यांची किर्ती संपून टाकली. कर्मचार्यांच्या पगाराचे पैसे थकीत, त्यांना मोजमजूरी करण्याची पाळी– स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी शेतकर्यांच्या उसाचे पैसे तसेच कारखान्यातील साध्या शिपाया पासून ते वरिष्ठ अधिकार्यांचे पगार त्यांनी कधीच थकीत केले नाहीत कारखाना बंद पडून जवळपास ३ ते ४ वर्षे झाली परंतु सध्या कारखाना विकला गेला सध्या तो सुरू असला

◆ पान ४ वरून पुढे...

तरी मागील कर्मचार्याचा पगार थकीत आहे. थकीत पगार मिळावा म्हणून कामगार संघटनेमार्फत न्यायालयात गेले. परंतु त्यांना थोडाफार पगार दिला गेला. त्याची ग्रॅजुटी, जी.पी.एफ.व पगार आजून बाकी आहे. त्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांना मोजमजूरी साठी वनवन फिरावे लागते. त्यांचा पगार त्वरित देण्यात यावा तसेच सभासदाना त्यांचे शेअर एक लाख रूपये प्रमाणे देण्यात यावे म्हणून सभासद सर्व न्याय मागण्यासाठी त्वरित न्यायालयात जाणार आहोत असे सभासदांतून बोलले जाते.

## प्रभाग एक....

एक प्रभागातील उमेदवार तुतारीचे मणीयार नावाच्या उमेदवाराच्या उमेदवारी अर्ज विद्रोल करण्यास कारणीभूत ठरले आणि या त्याच्या हाराखीरीच्या कार्यामुळे नगराध्यक्षपदाचे उमेदवार शिफा बिलाल चाऊस या नगरसेवक पदाचे दोन उमेदवार दोन प्रभागात नसल्यामुळे तेथील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला व नगरसेवक पदाच्या उमेदवाराला सोबत सोबत घेऊन चालणारे उमेदवार नसल्यामुळे अडचणीत आलेल्या आहेत असे स्वतःच्याच पक्षाला अडचणीत आणणाऱ्या प्रभाग एक मधील तुतारीचे उमेदवार शरद यादव यांची सुद्धा जागा धोक्यात आहे केवळ आणि केवळ पैशाचे जीवावर निवडून येणे व निवडून आल्यानंतर गुत्तेदारी करून गुंतवलेला पैसा परत करणे मिळविणे हा धंदाच राजकारणाचा शरद यादव यांनी बनवला आहे यांना प्रभागातील व शहरातील जनतेच्या विकास कामाशी देणे घेणे नाही फक्त गुत्तेदारी करून आपली तुंबड्या भरण्याचे काम करत आहेत

## गेवराई शहराच्या...

विश्वासामुळेच शहराचा सर्वांगीण विकास साधता आला. हा विकास प्रवास इथवर थांबणार नाही. पुढील पाच वर्षे हे शहर शाश्वत विकासाच्या नवनव्या अध्यायाकडे नेण्यासाठी आम्हाला तुमचा मतदानरुपी आशिर्वाद अत्यंत महत्त्वाचा आहे. शहरातील विविध प्रभागांत दररोज काढल्या जाणाऱ्या प्रचार रॅली, पदयात्रा व कॉर्नर बैठकींना महिलांपासून युवक, ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच मतदारांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचार फेरीदरम्यान झालेल्या संवादात अनेक नागरिकांनी पवार परिवाराने

◆ पान ४ वरून पुढे...

दिलेल्या कामांची यादी देत या वेळीदेखील भाजपला संधी देण्याचा निर्धार व्यक्त केला. शहराच्या सर्वसमावेशक विकासासाठी फक्त नगराध्यक्षच नव्हे तर सर्व २२ प्रभागांत सक्षम लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत. म्हणून भाजपच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना एकजुटीने, प्रचंड बहुमताने विजयी करून गेवराई शहराची विकासगाथा अधिक वेगाने पुढे नेत राहू. विशेष म्हणजे, शहरात भाजपच्या प्रचाराचा वेग एवढा वाढला आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस गट पूर्णपणे हतबल झाल्याचे जाणवत आहे.

## नांदेवाली येथे...

त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी भाविकांसाठी आयोजित करण्यात आली आहे. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या कुस्त्यांचा जंगी फड गुरुवार, दि. २७ रोजी रंगणार आहे. राज्यातील नामांकित पैलवान या मैदानात हजेरी लावणार असून प्रेक्षकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. विजेत्या पैलवानांना रोख बक्षिसे देण्यात येणार असून तरुणांमध्ये या स्पधारविषयी विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे.

## गेवराईची जनताच...

अमरसिंह पंडित यांच्यावर टीका करत ते म्हणाले, एक गाव दाखवा जिथे या माणसाने भलं केलं आहे. गेवराईला तर काही केलं नाही, उलट गावाची हागणदारी केली. जात, धर्म यांच्या नावावर राजकारण करणारे गेवराई शहराचा काय विकास करणार असे सांगत कडक शब्दात त्यांनी अमरसिंह पंडित यांचा समाचार घेतला. जनतेसमोर प्रामाणिकपणा अधोरेखित करत पवार म्हणाले, मी गेवराई शहराला जीव लावला आहे. आम्ही चुकीचे काम केले आणि माणुसकी व प्रामाणिकपणा सोडला तर आम्हालाही पाडा असे त्यांनी ठणकावून सांगितले. गेल्या १५ वर्षांत आम्ही कधीच सत्तेचा गैरवापर केला नाही. त्यामुळे यापुढेही गेवराईचा सर्वांगीण विकास करायचा असेल, तर भाजपचे सर्व २२ नगरसेवक आणि नगराध्यक्ष म्हणून गीताभाभीना प्रचंड मताने निवडून द्या असे आवाहन त्यांनी केले या सभेला संजय नगर सह परिसरातील महिला भगिनींसह प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी मतदारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने या कॉर्नर बैठकीचे विराट सभेत रूपांतर झाले होते

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# विविध शाळा, महाविद्यालये तथा संस्थांमध्ये संविधान दिन साजरा

## लिंबागणेश येथे भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करत संविधान दिन साजरा

### संविधान देशाचा राष्ट्रीय ग्रंथ असून अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करून राष्ट्रीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. यावेळी सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी प्रास्ताविक केले. ग्रामपंचायत सदस्य रमेश गायकवाड, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, दगडू वाघमारे आदींची समायोजित भाषणे झाली. आभारप्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य समीर शेख यांनी केले.



कार्यक्रमाला माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, माजी सरपंच बाळासाहेब मुळे, माजी उपसरपंच शंकर वाणी, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, महादेव कुदळे, नामदेव आवसरे, मधुकर थोरात, नाना निर्मळ, केशव गिरे, सिताराम थोरात, महादेव ढास, ग्रामपंचायत कर्मचारी जिवन मुळे, सुखदेव वाणी तसेच अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ व यमुना आबदार यांची विशेष उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत ऐतिहासिक संदर्भासह संविधानाच्या प्रवासाचा आढावा घेतला. ते म्हणाले- १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, मात्र त्यावेळी स्वतंत्र संविधान नव्हते. म्हणूनच संविधान सभा स्थापन झाली आणि २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती गठित करण्यात आली.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

### स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मृतिनिमित्त वृक्षारोपण व शहीदांना मानवंदना

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरालगत असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी.बी. चव्हाण हे होते. तर व्यासपीठावर ए.पी. वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्थेचे संस्थाचालक स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्या नंतर संविधान वाचन, संविधान चित्रांचे प्रदर्शन, प्रश्नमंजुषा आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी संविधानाचे मूल्य, लोकशाहीची तत्वे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे केली. संविधान दिनाचे औचित्य साधून संस्थाचालक स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मृती प्रित्यार्थ शाळेच्या मैदानात चिकू झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर संविधान दिनानिमित्त शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. बक्षीस वितरणानंतर शाळेतील काही निवडक विद्यार्थ्यांनी स्व. गोविंदराव वाघ यांच्या बद्दल तसेच संविधानाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या मनोगता नंतर वाव्हळ सर यांनी स्व. गोविंदराव वाघ सर यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान, दूरदृष्टी, तसेच कर्मचाऱ्यांबद्दल असणारी आपुलकी याबद्दल माहिती दिली.

## उपळी हायस्कूल उपळी मध्ये संविधान दिन उत्साहात साजरा



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी येथील उपळी हायस्कूल मध्ये आज २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय बडे भागवत सर यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष माननीय शेख मयूर सर उपस्थित होते. संविधान दिनाचे प्रास्ताविक शाळेच्या आदर्श शिक्षिका श्रीमती प्रज्ञा सौंदरमल यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे सांगून संविधान दिनाचे महत्त्व पटवून दिले. आज शाळेत झालेल्या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. या विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मातीकाम सेल्फी पॉईंट निबंध उत्कृष्ट पद्धतीने तयार केले होते.यावेळी शाळेतील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक घाडगे शंकर यांनी केले.

## प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात संविधान गौरव दिन उत्साहात साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**

२६ नोव्हेंबर प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान गौरव दिनानिमित्त हमारा संविधान हमारा स्वाभिमान हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. देशमुख आर. के. उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. इनकर विक्रम यांनी केले



त्यांनी आपल्या प्रास्ताविकेमध्ये विद्यार्थ्यांना संविधान वाचणे गरजेचे आहे. संविधानाने दिलेले स्वातंत्र्य समता बंधुत्व तसेच कर्तव्य याचे अवलोकन करून आपण वावरत असताना संविधानाने दिलेल्या मूल्यांची जोपासना केली पाहिजे असे सांगितले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. देशमुख आर. के. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संविधान लिहिण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक देशांचा राज्यघटनेचा अभ्यास करून तसेच १९३५ च्या कायद्याचा अभ्यास करून भारतामध्ये सर्व जनतेला न्याय देण्यासाठी भारतीय संविधान परिपूर्ण असे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी दोन वर्षे ११ महिने १८ दिवस एवढ्या कालावधीनंतर भारतीय नागरिकास सुपूर्त करण्यात आले. त्या भारतीय राज्यघटनेनुसार भारतीय नागरिक आज सुखी समाधानाने जीवन जगत आहेत. या संविधानाने सर्व स्तरातील नागरिकांना न्याय देण्याचे काम केलेले आहे. असे सांगण्यात आले. डॉ. ढास डी. के.यांनी अध्यक्षीय समारोप करताना भारतीय संविधानाने दिलेल्या नियमांचे सर्वांनी पालन केले पाहिजे असे सांगितले तसेच सर्वांना भारतीय संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. रामरुले डी.के. यांनी केली तर आभार प्रा.विजय मस्के यांनी केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संविधान दिनानिमित्त मिलिया प्राथमिक शाळा, बीड येथे विशेष कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

मिलिया प्राथमिक मुलीची शाळा, बीड येथे मोठ्या उत्साहात संविधान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थिनींना भारतीय संविधानाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली, ज्यामुळे त्यांना देशाच्या या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे महत्त्व समजून घेता आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मिर्झा कनीज फातेमा यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यांनी विद्यार्थिनींना संविधानाची निर्मिती, त्याचे उद्देश आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्ये याबद्दल विस्तृत माहिती दिली. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिले आहेत आणि देशाच्या विकासात संविधानाचे योगदान अनमोल आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी शाळेच्या प्रभारी श्रीमती रिझवाना बाजी, श्रीमती मसरत बाजी, श्रीमती सबिहा खतीब बाजी, श्री. फैसल शिक्षक, श्रीमती हाजरा बाजी, श्रीमती सना बाजी, श्रीमती सहेर बाजी, श्रीमती निशात बाजी, श्रीमती शाझिया बाजी, श्रीमती आर्शीया बाजी, श्रीमती तासलीम बाजी, श्रीमती साबा बाजी आणि श्रीमती सबा अंजुम बाजी यांसह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांनी संविधानाच्या मूल्यांचे पालन करण्याची आणि देशाचे एक जबाबदार नागरिक बनण्याची शपथ घेतली.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीड मध्ये राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर व प्रमुख पाहुणे डॉ.काकासाहेब पोकळे यांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर भारतीय राज्यघटनेतील उद्देशिकेचे सार्वजनिक वाचन करण्यात आले.




भारतीय राज्य घटना २६ नोंव्हेंबर १९४९ रोजी संसदीय विधीमंडळात स्विकारल्या गेली म्हणूनच आज संविधान दिन साजरा करण्यात येतो.आजच्या या दिनी ज्यांनी संविधान लिहिले त्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधाना बद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आजचा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.कारण संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिले आहेत त्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो.तसेच देशातील नागरिकांमध्ये घटनात्मक मुल्यांबद्दल आदराची भावना वाढवणे हा संविधान दिनाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे डॉ.गणेश कदम तर आभार डॉ.संजय मोरे यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.ए.एस. खान, डॉ.पांडूरंग केदार, डॉ.शेख शकील, डॉ.संजय काळे,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.यादव घोडके व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान दिन साजरा

**येळंब (घाट) । प्रतिनिधी**

दिनांक २६ नोव्हेंबर:२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान तयार झाले. संविधानाने विविधतेत एकता आणि समानता निर्माण केली असे प्रतिपादन बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येळंब घाटचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राजकुमार कदम यांनी केले. संविधान दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या बाबत अधिक माहिती अशी की, येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राजकुमार कदम होते तर पर्यवेक्षक चौरे व्ही. एस., यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये भारतीय संविधान दिन

**वडवणी । प्रतिनिधी**

चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच यावेळी २६/११ मध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावंत यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून केली.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६३४/२०२५

अर्जदार- (१) सुमनबाई भ्र. आसाराम शिंदे, वय ७० वर्षे, धंदा-घरकाम, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड. २) संजय पि. आसाराम शिंदे, वय ५० वर्षे, धंदा-शेती, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड. (३) चंद्रकांत पि. आसाराम शिंदे, वय ४७ वर्षे, धंदा-शेती, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड ४) सुनिल पि. आसाराम शिंदे, वय ४१ वर्षे, धंदा-शेती, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड (५) प्रयागाबाई भ्र.भिमराव शिंदे, वय-९१ वर्षे, धंदा घरकाम, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार :

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे आसाराम भीमराव शिंदे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे आसाराम भीमराव शिद, रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड हे दिनांक २९/१०/२०२४ रोजी काकु नाना मेमोरियल हॉस्पीटल, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. मयत आसाराम भीमराव शिंदे यांचे वडील पुर्वीच मयत झालेले आहेत. मयतास मुलगी नाही. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक ०६/१२/२०२५

आज दिनांक-- / ११ / २०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(मार्फत- ॲड. शिदि जी. पी.)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड

शिक्का

(स्वाक्षरीत) क. लिपीक

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक. ९६१/२०२५

श्रीमती राधाबाई भ्र ज्ञानोबा ढाकणे वि. निरंक

ज्याअर्थी मयत नामे ज्ञानोबा पिरमाजी ढाकणे हे / हया दिनांक. १४/०५/२०२२ रोजी मौजे वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१. श्रीमती राधाबाई भ्र ज्ञानोबा ढाकणे, वयः ७० वर्षे, धंदः घरकाम. रा. वडगावढोक ता. गेवराई जि.बीड

२. बाळासाहेब पि ज्ञानोबा ढाकणे, वय: ५० वर्षे, धंदः शेती रा. सदर

३. सर्जेराव पिज्ञानोबा ढाकणे, वय: ४७वर्षे, धंदः शेती रा. सदर

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत ज्ञानोबा पि रमाजी ढाकणे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०१/ ०१ / २०२६

(मार्फत-ॲड आर. ए. जोशी, गेवराई)

आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई

शिक्का

(स्वाक्षरीत) क. लिपीक

**मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे कार्यालय,**

'सहकार शक्ती' इमारत, जालना रोड, बीड.

{Phone No. 02442-222321; Email Id :ddr_bid@rediffmail.com}

जा.क्र. निवडणुक/प्रारुप मतदार यादी/जाहीर प्रगटन प्रसि.बा./ 3305 / 2025 दिनांक: 27 नोव्हेंबर, 2025

**// जाहीर प्रगटन //**

**मा. प्राधिकरणाच्या सुचनेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, 2014 चे नियम 4 (ii) नुसार "ब" वर्गातील अंबाजोगाई तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड, 02. अंबिका शेतीमाल प्रक्रिया सहकारी संस्था मर्या. बीड, ता. जि. बीड, 03. अंबिका मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. बीड, ता. जि. बीड या संस्थांची प्रारुप मतदार यादी अंतिम करणेबाबतचा निवडणुक कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे**

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.27/11/2025 | स. 11.00 वाजता | संबंधित संस्थेचे कार्यालय व उप/ सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. बीड/अंबाजोगाई व या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर. |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर दावे / हरकती घेणे | दि.27/11/2025 ते दि.08/12/2025 | स.11.00 ते दु. 3.00 वाजेपर्यत | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| 3 | प्राप्त दावे व हरकतीवर सुनावणी घेणे | दि. 15/12/2025 | सकाळी 11.30 | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| 4 | प्राप्त दावे व हरकतीवर निर्णय घेणे | दि.18/12/2025 | दु. 05.30 वा. | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड |
| 5 | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.23/12/2025 | स.11.00 वाजता | संबंधित संस्थेचे कार्यालय व उप/ सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. बीड/अंबाजोगाई व या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर. |

**टिप : प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करताना आक्षेपकर्त्यांनी पुराव्यासह आक्षेप अर्ज तीन (03) प्रतीत सादर करणे बंधनकारक राहील. आक्षेपकर्त्यांनी पुराव्याशिवाय दाखल केलेला आक्षेप अर्जाची दखल घेतली जाणार नाही.**

**(सतिश तोटावार)**

**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड.**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ ● पान ४



*यळकोट यळकोट जय मल्हार! तळी भंडारा हे आहे आमचं गावगाढ्यातील नातं.. .मराठा समाजासह अठरापगड जातीतील लोक आज सकाळपासुनच त्याच्या मागे होती.घरात तळी भंडारा ऊचलण्यासाठी आज त्याचाच मान होता.. भांडणारे भांडवल करतात जातीचे,पण आमच माणुसकीच नातं अगदी घट्ट आहे. मातीतील लोकांचं.... माणूसकी गावगाडा*

# माध्यम प्रनिनिधींनी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास माध्यम प्रवेशिकेसाठी अर्ज करावा

● नगरपालिका निवडणूक २०२४ कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

नगरपालिका निवडणूक २०२५ कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील बीड, गेवराई, परळी वैजनाथ, अंबाजोगाई, माजलगाव आणि किल्ले-धारूर या ६ नगरपालिकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान आणि ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे. याचे वृत्तसंकलन करण्यासाठी माध्यम प्रतिनिधींनी या नगरपालिकांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

माध्यम प्रतिनिधींनी आपल्या संपादकांच्या शिफारस पत्रासह ३ छायाचित्रे तसेच आधार क्रमांकाच्या पुराव्यासह संबंधित कार्यालयांकडे अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा माध्यम संनियंत्रण व माध्यम प्रमाणन (MCMC) समितीने केले आहे.याबाबत निवडणूक मार्गदर्शक तरतुदीत असलेल्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी हे आदेश जारी केले आहेत. यानुसार बीड सह उर्वरित



५ नगरपरिषदांच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना प्रवेशिका जारी करणारे प्राधिकारी घोषित करण्यात आले आहे.

## माध्यम प्रतिनिधींना सूचना

कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने प्रसार माध्यमातील प्रतिनिधींना मतदान केंद्र तसेच मतमोजणी केंद्रात प्रवेशिकेशिवाय प्रवेश करता येणार नाही. विहित पद्धतीनुसार माध्यम प्रतिनिधींना संपादकांच्या शिफारस पत्रासह ताज्या ३ छायाचित्रांसह आणि ओळख पटवण्यासाठी आधार ची झेरॉक्स किंवा वृत्तपत्राने दिलेले ओळखपत्र यांची झेरॉक्स अर्जासह जोडावी. राज्य शासनाच्या यादीवरील वृत्तपत्रांसाठी दैनिकाचे संपादक व प्रतिनिधी (अधिकाधिक २ जणांना) प्रवेशिका दिला जातील. उपग्रह वाहिन्या तसेच टपाल खात्याचा परवाना असलेल्या केबल साठी १ प्रतिनिधी व १ कॅमेरामन याप्रमाणे २ प्रवेशिका मिळू शकतील.

वर नमूद व्यतिरिक्त (उदा. युट्यूब चॅनेल, ऑनलाईन वृत्तपत्र, संकेतस्थळ, सोशल मिडिया हॅन्डल) कुठल्याही प्रतिनिधीला किंवा कॅमेरामनला प्रवेशिका देण्यात येणार नाही. प्रवेशिका संख्या कमी करण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी (प्राधिकारी) यांना असेल.

## थोडक्यात...

### लक्ष्मण दादा पवळ यांचा थेट भेटीगाठींवर भर




**बीड । प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक एक मध्ये काँग्रेसचे उमेदवार सौ. कोकिळा, लक्ष्मण दादा पवळ यांची पत्नी प्रभाग क्रमांक एक मध्ये काँग्रेस कडून उभे आहेत. लक्ष्मण दादा पवळ यांनी जनसामान्यांच्या अडी अडचणीला नेहमी धावून आल्याने पाहिली पसंती मिळत आहे. पवळ यांनी केलेल्या विकास कामाची पावती म्हणून जनता मायबाप आम्हांला मतदान रुपी आशीर्वाद देतील असे सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेसचे नेते लक्ष्मण दादा पवळ यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. बीड येथील वार्ड क्रमांक एक मध्ये पवळ नागरिकांशी संवाद साधत आहेत. यामध्ये सर्व जाती धर्मातील लोक लक्ष्मण दादा पवळ यांचा चाहता वर्ग असल्यामुळे त्यांचा हाताचा पंजा हे चिन्ह असल्याकारणाने लक्ष्मण दादा पवळ यांच्या पत्नी प्रचंड बहुमताने निवडून येतील असे वार्ड क्रमांक एक मध्ये मतदार राजा बोलत आहे.

### जात पडताळणी समितीतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान या कार्यक्रमाचे औचित्य साधून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी बीड समितीमार्फत दि. २६ नोव्हेंबर ते दि. २६ जानेवारी या कालावधीत कार्यालयात विशेष मोहिम शिबिर राबविण्यात येत आहे. समिती कार्यालयात दररोज कार्यालयीन वेळेत अधिकारी, कर्मचारी तसेच अर्जदार, पालक यांच्या उपस्थितीत त्यांना संविधानाचे वाचन, भारतीय संविधानाचे महत्व याबाबत माहिती देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या वर्षातील विविध व्यावसायिक पाठयक्रमामध्ये राखीव प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वैधता प्रमाणपत्राअभावी शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी समितीकडून विहित मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी व जातवैधता प्रमाणपत्र मिळवितांना येणाऱ्या अडीअडचणीबाबत अर्जदार व पालकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच समितीने वैध करण्यात आलेल्या प्रकरणात अर्जदार यांना ऑनलाईन प्रक्रियेद्वारे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येणार आहे. ज्या जातीदावा प्रकरणांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत अशा प्रकरणांमध्ये प्राधान्याने अर्जदार यांना एसएमएस व ई मेलद्वारे कळवून त्यांच्याकडून समिती कार्यालयात त्रुटीची पुर्तता करुन तात्काळ प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. समिती स्तरावर विशेष सुनावणी आयोजित करुन देखील जातीदावा प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यात येणार आहेत. तेंव्हा दि. २६ नोव्हेंबर ते दि. २६ जानेवारी या कालावधीत समितीमार्फत आयोजित केलेल्या सदर विशेष मोहिम शिबिराचा अर्जदार, पालकांनी समिती कार्यालयात उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष, उपायुक्त तथा सदस्य व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी केले आहे.

### पोरांच्या टोळक्याने विद्यार्थ्याला घेरुन बेदम मारलं



**बीड । प्रतिनिधी**

पोरांच्या टोळक्याने विद्यार्थ्याला घेरुन बेदम मारलं, गुरासारखा हंबरडा फोडला तरी सोडलंच नाही. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. बीड जिल्ह्यात मारहाणीच्या घटना सुरूच असून असाच एक प्रकार पुन्हा समोर आला आहे. शिरूर तालुक्यातील रायमोह येथे अपंग मतिमंद विद्यालयाच्या गेट बाहेर एका विद्यार्थ्याला पाच ते सहा विद्यार्थ्यांच्या टोळक्याकडून बेदम मारहाण करण्यात आली आहे. मारहाणीचा व्हिडिओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. दोन दिवसांपूर्वीचा हा व्हिडिओ असून विद्यार्थ्याला मारहाण करण्याचं कारण अद्याप समजू शकलेल नाही. तर याप्रकरणी पोलीस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. परंतु जिल्ह्यात सतत मारहाणीच्या घटना समोर येत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दरम्यान या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झाला नसला तरी पोलीस काय कारवाई करणार का हे पाहणं महत्त्वाचं असेल. शाळेच्या गेटबाहेरच विद्यार्थ्यांवर हल्ले होत असल्याने पालकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. अनेक पालकांनी या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यात अशा घटना वारंवार घडत असताना पोलिस प्रशासनाची भूमिका किती प्रभावी आहे, यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. जिल्ह्यातील सततच्या मारहाणीच्या घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेवरील प्रश्नचिन्ह अधिक गडद होत असून नागरिकांकडून कठोर उपाययोजनांची मागणी वाढत आहे.

# मतदान 100% करण्यासाठी गेवराई येथे नगरपरिषद गेवराई कार्यालयाच्या वतीने चार्ली चाप्लिन ने केली मतदार जनजागृती

**सु-लक्ष्मी सेवाभावी संस्था व ज्युनिअर चार्ली फाउंडेशन चे कलाकार समाजसेवक सुमित पंडित यांनी आपल्या मुक अभिनयातुन गेवराईकरांना केले मतदान करण्यासाठी आव्हान**

**गेवराई । प्रतिनिधी**

आपल्या मूक अभिनयाने अवघ्या जगाला भुरळ घालणारे चार्ली चॅप्लीन यांची भुमिका जिवंत ठेवण्यासाठी ज्युनिअर चार्ली फाउंडेशन चे कलाकार समाजसेवक सुमित पंडित यांनी गेवराई नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का १००% वाढविण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे ज्युनियर चार्ली



सुमित पंडित यांनी चंग बांधला आहे.आज बीड जिल्ह्यातील गेवराई येथे जाऊन दिवसभर गेवराई शहरांमधील वेगवेगळ्या ठिकाणी सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळ पर्यंत चार्लीच्या वेशभूषेतून मुक अभिनयातुन गेवराई नगरपालिका निवडणूकीत नागरिकांनी मतदान करण्याचे आवाहन केले.चार्लीची हुबेहुब व्यक्तिरेखा साकारणाऱ्या या ज्युनिअर चार्ली ला गेवराई करांनी भरभरून ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड नगर पालिका निवडणुकीसाठी लागणार ५९० युनिट बॅलेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली असून बीड शहरातील २५ वार्डातून निवडूण येणाऱ्या ५२ नगरसेवक आणि नगराध्यक्षपदांसाठी ८० केंद्रातील १७९ बूथवर मतदान होणार आहे.

त्यासाठी ५९० बॅलेट तर १९७ कंट्रोल युनिक लागणार आहेत. ८० पैकी तब्बल ५२ केंद्रावर सीसीटीव्ही लावण्यात येणार असून १ आदर्श मतदान केंद्र तयार करण्यात येणार आहे. एका मशिन वर १५ उमेदवारांचे नावे असणार आहेत. बीड नगर पालिकेत चौरंगी लढत होत आहे. चारही पक्षांनी नगराध्यक्षासह सर्वच ५२ जागेवर उमेदवार दिलेले आहेत. याशिवाय काही भागात मैत्रीपूर्ण लढत होत असल्याने पक्षाच्या उमेदवारांची संख्याही मोठी आहे. नगराध्यक्ष पदासाठी १९ तर नगरसेवक पदासाठी २८७ असे ३०६ उमेदवार बीड पालिकेच्या निवडणूक रिंगणात उतरलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाला तगडा बंदोबस्त आणि मोठी यंत्रणा उभी करावी लागत आहे. बीड शहरात १ लाख ८० हजार ६८५ मतदार आपला हक्क ▶▶ उर्वरित पान २ वर

# वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना सभासदांना शेअरपोटी एक लाख द्या

● सभासद न्यायालयात दाद मागणार

**परळी वै. । प्रतिनिधी**

स्व.लोकनेते माजी केंद्रीयमंत्री मराठवाड्याचे शिल्पकार शेतकरी, कामगार व कष्टकर्यांचे लाडके नेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांनी शेतकर्यांच्या हितासाठी व कष्टकर्यांना काम मिळावे म्हणून परळी तालुक्यातील पांगरी येथे वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना लि.पांगरी येथे उभा केला. कारण ते एक शेतकर्यांचे पुत्र होते. शेतकर्यांच्या कष्टाची त्यांना ज्ञात होती. कारखाना उभा करण्यासाठी शेतकर्याकडे सभासद होण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. त्यांनी सोसायटी मार्फत सुरूवातीला थोडे फार पैसे घेतले व नंतर त्यांना उस लागवडीसाठी विविध बँकेमार्फत कर्ज देवून शेअर जमा केले व उस लागवड करण्यास सांगितले. कारखाना व्यवस्थीत सुरू झाला. शेतकरी खूश झाले. शेतकर्यांना स्वतःच्या कारखान्यातून दिवाळी साखर मिळू लागली. बरेच वर्षे कारखाना व्यवस्थीत सुरू झाला. त्यांनी आपल्या सध्याच्या मंत्री पंकजाताई यांना त्यांचा वारस केले व पुढे सहकारी साखर कारखान्याला कोणाची नजर लागली ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रभाग एक चे उमेदवार शरद यादव आपल्याच तुतारी चिन्हाचे दोन प्रभागातील उमेदवार अर्ज विड्रॉल करण्यास कारणीभूत नगराध्यक्ष पदाच्या तुतारीला अडचण

**माजलगाव । प्रतिनिधी**

सध्या माजलगाव शहरात नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीची जिकडे तिकडे चौका चौकात चर्चाच आहे तुतारी व घड्याळाचे उमेदवार त्यांचे नेते एकमेकावर खालच्या पातळीवर व वैयक्तिक रित्या टीका करण्यात दंग असून जनता यांच्या टीका बघून विकासापासून कोसो दूर राहिलेल्या शहरवाशीय हवालदिल झाले



त्यातच प्रभाग क्रमांक एक मधील तुतारीचे उमेदवार शरद यादव हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गेल्या अनेक वर्षापासून नगरपरिषदेत गटनेते होते त्यांनी अनेक गुत्तेदारीचे कामे १७ टक्के टक्केवारी देऊन घेतलेले आहे व हेच प्रभाग एक मधील तुतारीचे उमेदवार शरद यादव यांनी आपल्याच तुतारीच्या चिन्हावर निवडणूक लढवणारे कालुबाई गुत्तेदार यांचा अर्ज विड्रॉल करायला कारणीभूत ठरले तर तर दुसरी ▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई शहराच्या शाश्वत विकासासाठी आशिर्वाद द्या: सौ. गिताभाभी पवार



● गेवराईत भाजपच्या सुसाट प्रचारलाटेत राष्ट्रवादी बेजार

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रचाराचा माहोल एका नव्या उंचीवर पोहोचला असून भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार यांच्या दमदार प्रचार मोहीमेने शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. गेल्या वीस वर्षांपासून पवार परिवाराने

**शाश्वत विकासाची नवी दिशा**

**पाणीपुरवठा, रस्ते, बाजारपेठांचा विकास, कचरा व्यवस्थापन, डिजिटल प्रशासन, महिला सक्षमीकरण यांसह अनेक नवनवीन प्रकल्पांची घोषणा करत त्यांनी भविष्यातील नवीन गेवराई ची रूपरेषा मतदारांसमोर मांडली. यावर जनतेचा मिळणारा सकारात्मक प्रतिसाद पाहता, आगामी निवडणुकीत भाजपच्या बाजूने एकतर्फी वातावरण तयार होत असल्याचे दिसून येत आहे.**

गेवराई शहराला कुटुंबाप्रमाणे जपत प्रत्येक प्रभागात विकासा कामे करत शहराचा चेहरामोहरा बदलला असून येणाऱ्या काळातही शहराच्या शाश्वत विकासासाठी मला आशिर्वाद द्या असे आवाहन त्यांनी प्रचार फेरी दरम्यान केले. सौ. गिताभाभी पवार यांनी मतदारांशी संवाद साधताना म्हटले की, गेल्या दोन दशकांपासून गेवराईकरांनी आमच्यावर ठेवलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# नांदेवाली येथे खंडोबा यात्रेचे आयोजन गुरुवारी कुस्त्यांचा फड रंगणार

**नांदेवाली । प्रतिनिधी**

ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेली श्री खंडोबा देवाची पारंपरिक यात्रा यावर्षी चंपाषष्ठी उत्सवानिमित्त मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे. परिसरातील गावांमधून मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असून संपूर्ण नांदेवाली गाव भक्तीभावाने दुमदुमून गेले आहे. यात्रेपूर्वी ग्रामस्थांच्या वतीने धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे विशेष नियोजन करण्यात आले आहे. पालखी मार्ग, कुस्ती मैदान आणि गावाचा परिसर स्वच्छतेने सजला असून वाहतूक व्यवस्था तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गावातील श्री खंडोबा मंदिर आकर्षक फुलांनी सजविण्यात आले असून नित्यपूजा, विविध नैवेद्य व भजन-कीर्तनांच्या कार्यक्रमांनी भंमिय वातावरण निर्माण झाले आहे. 'येळकोट येळकोट जय मल्हार!' या जयघोषांनी संपूर्ण गाव उत्साहात निनादत आहे. मंगळवार, दि. २५ रोजी यात्रेची सुरुवात नागदिवा कार्यक्रमाने झाली. भरीत-रोडगा नैवेद्य दाखवून ग्रामस्थ वांगे-कांदे खाण्याची प्रथा पाळतात. सायंकाळी श्री खंडोबा देवाचा भव्य छबिना ढोल-ताशा, बँड पथके आणि पारंपरिक वेशभूषेत संपूर्ण गावातून मिरवला जाणार आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईची जनताच इथली खरी मालक, तुमच्या विश्वासावरच शहराचा आणखी कायापालट करू: बाळराजे पवार

**संजय नगर भागातील भाजपच्या कॉर्नर बैठकीला विराट सभेचे स्वरूप**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेल्या वीस वर्षांपासून मी गेवराई शहराच्या काळजीने लढत आलोय. अजूनही लढतोय, कारण तुम्ही माझ्या पायात बळ दिलं आहे. स्वप्न पाहायचं असेल तर त्यासाठी आहुती द्यावी लागते. जीवनाची आहुती दिल्याशिवाय गाव उभा राहत नाही. गेवराईची जनताच इथली खरी मालक आसून जनतेच्या विश्वासानेच शहराचा आणखी कायापालट करू असे प्रतिपादन भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षा पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी बाळराजे पवार व प्रभाग क्रमांक १, २, ३ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. यावेळी सौ. गिताभाभी, पवार ,भाजपाचे पि.टी. चव्हाण, श्रिकात सानप,या.अध्यक्ष सचिन दाभाडे, उध्दव रासकर, रत्नमाला मोटे,आदि दरम्यान मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या बैठकीला सभेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, जगाला माहीत आहे की, मी जेलमध्ये होतो. पण गेवराईच्या हितासाठी जे काही करावं लागलं, ते केलं. सहा महिने महाराष्ट्रातील विविध नगरपरिषदा पाहत फिरलो. अपक्ष असताना पैसे नव्हते, तरीही घंटा गाडी सुरू करून शहराला कचरा मुक्त करण्यासाठी काम केलं. दिवसभर सफाईसाठी धडपड केली. माझं संपूर्ण आयुष्य गेवराई शहराला अर्पण केलं आहे. नगरपरिषदेच्या आर्थिक स्थितीचा उल्लेख करत पवार म्हणाले, दर महिन्याला दहा लाख रुपये वीज बील आणि वर्षाला नऊ कोटी रुपयांची जबाबदारी असणारी गेवराई नगरपरिषद चालवताना आम्ही एक रुपयाचाही गैरव्यवहार केला नाही. हे सारे पैसे आम्ही खाल्ले असते, तर शहराची अवस्था वेगळी दिसली असती.

पैठण प्रकल्पाबद्दल बोलताना त्यांनी विरोधकांवर टीका करत सांगितले, पैठणहून पाणी आणू म्हणलं तेव्हा विरोधक हसायचे. पण ते काम आम्ही करून दाखवलं. आज रोज पाणी देता येईल, काही अडचण नाही. पण पाण्याचा अपव्यय होईल हे सुद्धा काही लोकांना कळत नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर